The journal has been uploaded in UGC CARE PORTAL. (RTI)
http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 9, September 2021, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# Dr. BABASAHEB AMBEDKAR YANCHE SHAIKSHANIK VICHAR



Dr. Narwade Jalba Meshram

Arts, Science & Commerce College, Badanapur

Dist. Jalana

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**डॉ. नरवाडे जळबा मेश्राम**
**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर जि. जालना**

थोर विचारवंत समाजसुधारक, दलित-शोषित पिडितांचे कैवारी, क्रांतीकारक महापुरूष थोर शिक्षणतज्ञ विश्वरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते. भारतीय समाजाला विज्ञानवादी आणि मानवतावादी विचारांची एक नवी दृष्टी त्यांनी दिली. भारतीय समाजाला काळोखाच्या गर्भातून बाहेर काढून परिवर्तनाच्या विकासाच्या सूर्यप्रकाशात आणून ठेवणारे युगपुरूष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १९९१ रोजी मध्यप्रदेशातील इंदौरमधील महू येथे झाला. त्यांचे वय सहा वर्ष असतांना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यांचे व त्यांचा भावडांचा सांभाळ आत्या मिराबाईंनी केला. अशा अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत बाबासाहेबांनी स्वतःचे शिक्षण घेतले.ञ इ. स. १९०८ मध्ये त्यांनी मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण केली. इ. स. १९१२ मध्ये मुंबईच्या एलिफिसन्टन महाविद्यालयातून बी. ए. पदवी प्राप्त केली. पदवी घेतल्यानंतर बडोदा संस्थानमध्ये नौकरी स्विकारली.

संस्थानातील शिष्यवृत्ती मिळवून जुलै १९९३ मध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले व जून १९१५ मध्ये राज्यनिती, तत्वज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व मानसशास्त्र हे पाच विषय घेवून एम. ए. पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून जून १९२१ मध्ये एम. एस्सी. परीक्षा पास केली. जून १९२२ मध्ये ग्रेनईन (लंडन) मधून बॅरिस्टर ही कायद्याची पदवी मिळवली. तसेच सन १९२७ मध्ये कोलंबिया विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली. ५ जून १९५२ मध्ये त्यांना कालंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी बहाल केली. १२ जानेवारी १९५३ मध्ये उस्मानिया विद्यापीठाने डी.लिट. पदवी बाहल केली. या सर्व पदवी मिळविण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले.

**शैक्षणिक कार्य :**

देशातील अस्पृश्यता, गुलामगिरी, अप्रतिष्ठा यांचे चटके बाबासाहेबांनी लहानपणापासूनच सहन केले होते. स्वातंत्र, समता, बंधुत्व यांची महती त्यांनी ओळखली होती. या सर्वांवर मात करायचे असेल तर समाज शिक्षणाच्या बाबतीत जागृत करणे शिक्षणाचा दर्जा सांगताना शिक्षण म्हणजे ज्ञान आणि विवेक यांचा सुरेख संगम होय. ज्ञान उपयोगात आणले नाही तर ते नुसतेचे शोभेचा दागिणा ठरेल. शिक्षणाची परिणती चरित्रनिर्मितीत झाली पाहिजे. शिक्षण हा राष्ट्रीय उन्नतीचा मुलमंत्र आहे. व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण होय, शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ पशु आहे.

अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी व तयांना जागृत करण्यासाठी, समाजाचा खचलेला आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा समाज शिक्षणाने पुढे आल्यानेच त्त्याचा विकासस होऊ शकेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.

डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य खालीलप्रमाणे थोडक्यात -

१. दलित समाजाला शिक्षणाची फार गरज आहे हे ओळखून त्यांच्या शिक्षणाच्या सोईवर भर दिला व त्यांना जागृत करण्यासाठी दिनांक २० जुलै १९२४ रोजी बिहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालये , समाजकेंद्रे, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केली तसेच औद्योगिक आणि कृषीशाळा उघडून दलित वर्गाची आर्थिक स्थिती सुधारणा करणे हे उद्दिष्टे होते.

२. १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेती (Defressed Claasses Education Society) ची स्थापना केली व दलित वर्ग आणि मुलांना शिक्षण, वसतीगृह पुरविण्यासाठी मुंबई शासनास आवाहन केले.

३. ९०० वार्षिक अनुदानाची गुंतवणूक करणाऱ्या या पाच वसतीगृहाचे व्यवस्थापन त्यांनी संस्थेवरच सोपविले होते.

४. शासनाने दिलेल्या अनुदानामध्ये खर्च भागत नव्हता म्हणून त्यांनी देणग्या गोळा कराव्या लागत. काही लोकांनी त्यांना वसतीगृहासाठी जमिनी मोफत दिल्या.

५. महाविद्यालयीन शिक्षण मुलांना घेता यावे म्हणून १९४५ मध्ये मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. दिनांक २० जून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज व दिनांक १९ जून १९५० ला औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालय सुरू केले े. मुलांसाठी शाळा, ममहाविद्यालय व वसतीगृह सुरू करून अस्पृश्य बांधवांना संघटित केले.

६. १९२७ साली तात्कालीन विद्यामंत्र्यांना प्राथमिक शिक्षणाचे महत्व पटवून सांगताना ते प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असं असले पाहिजे की मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत घातली तर त्याचं किंवां तिचं शिक्षण लिहिता वाचण्याच्या अवस्थेपर्यंत राहू नये, तर तो संपूर्णपणे सुशिक्षित होऊनच बाहेर पडावा व पुढील आयुष्यात सुद्धा ज्ञ ाान घेत असावा.

७. प्राथमिक शिक्षणाच्या खर्चावर बोलतांना सांगतात आपल्या प्रातांत शिक्षणावर प्रति व्यक्ती फक्त १४ आणे खर्च केला जातो. सरकारी करातून प्रति व्यक्ति २१७ रूपये मिळतात. तेवढे शासनाने प्राथमिक शिक्षणावर खर्च केले तरी शिक्षणासंबंधी न्याय होईल.

८. सन १९२५-२६ मध्ये मुंबई विधिमंडळात मुंबई विद्यापीठ दुरूस्ती कायदा चर्चेला आणला, त्या चर्चेत डॉ. बाबासाहेब आंबेडकांनी विद्यापीठविषयीचे विचार व्यक्त करतांना Bombay and poona a are the only place ripe for immedidate exapansison into universities aand i suggest that there be at once incoporated intto universities. विचार मांडलेत.

९. विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमांना गती देणारे अध्यापक मंडळ हवे, विद्वानाना निर्णयाचे स्वतंत्र हवे पदव्या देण्याचे कायदे करावेत, अभ्यासक्रमाची अआखणी करूनू ते राबबवावेत, अध्यापन पद्धती कोणती योजावयाची याचे निर्णय करावा असे अनेक विचार त्यांनी मांडले.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेंडकरावंनी २९ ऑक्टोबर १९४२ रोजी एक ५६ पानाचा खलिता गव्हर्नर जनरल यांनां सादर केला. तयामध्ये अस्पृश्यांची शैक्षणिक दु:खे, तांत्रिक शिक्षणाचची नाचक्की, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेततील उच्च शिक्षणाची बाजू मांडली व तांत्रिक शिक्षणात अस्पृश्यांचा शिरकाव होण्या ासाठी उपाय सांगितले.

अ) हिंदूस्थान विद्यापीठात किंवा तत्सम तंत्रशिक्षण यांच्या अनुसूचित जातीतील विद्यार्थी आणिा तंत्रज्ञान शाखातील उच्चशिक्षण घेत तर त्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती रूपान वार्षिक २ लाखाचे अनुदान द्यावे.

ब) इंग्लंड, राष्ट्रकुल राष्ट्रे, युरोप आणि अमेरिका येथील विद्यापीठातून अनुसूचित जा ातीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखातील उच्चिशिक्षणासाठी सरकारने १ लाखाचे अनुदान द्यावे.

११. विविध परिषदांमधून तसेच आपल्या लिखानातून हिंदूकोड बीलाच्या माध्यमातूनू राज्यघटनेतून स्त्री-पुरूष समानते चा पुरस्कार करून स्त्रियांची स्थितती सुधारण्याचा प्रयत्न केला. मुलींना शिक्षण दिल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होईल. समाजामध्ये स्त्री ही अतिशय महत्त्वाची असून स्त्री म्हणजे संस्कृती होय.

१२. मुंबई, औरंगाबाद, पंढरपपूर व सोलापूरू येथे शिक्षणसंस्था व वसतीगृहांची स्थापना करून आपले स्त्री शिक्षण विषयक स्थान साध्य केले. स्त्री फक्त चूल आणि मुल सांभाळणारी नसून पुरूषांची दासी नसून स्त्री धैर्याचा महामेरू जन्मास घातले असे विचार डॉ. बाबासाहेबब आंबेडकरांनी मांडले.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांची अत्यंत आवश्यकता आहे असे नमुद करावेसे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात ज्ञान-ज्ञानाशिवाय जगू शकत नाही. तो खरा शिक्षक होय. तसेच शिक्षण हे समाजाभिमुख असायला पाहिजे. शिक्षणानेच समाजातील अंधार दूर होऊ शकतो. शिक्षणाने माणसाला माणूसपण मिळते. व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाच आहे. शिक्षण हे समाज परितर्वनाचे साधन आहे. स्त्रीयांनी आपल्या प्रगतीसाठी शिक्षण घ्यायला पाहिजे. शिक्षणामुळे स्त्री आपल्या कुटुंबाचे नाव लौकिक करत असते. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार पाहता आपल्याला असे लक्षात येईल की, त्यांच्या शैक्षणिक विचाराची गरज आज वाटत आहे. शिक्षणाचे आज बाजारीकरण झाले आहे. शिक्षणाचे परिविर्तन होते. जीवनाचा धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक असा सर्वच क्षेत्रामध्ये शिक्षणामुळे परिवर्तन होत असते. मानवी अस्तित्वाचा जन्म शिक्षणाच्या पोटअी होत असतो. पण हेच शिक्षण माणसाला मिळाले नाही तर तो निबुंद्ध राहून जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो. असेही डॉ. आंबेडकरांनी आपल्या शैक्षाणिक विचारात सांगातात. मागासलेल्यांना शिक्षण मिळायला पाहिजे यासाठी त्यांनी शिष्यवृत्ती सुरू करून दिली. जेणेकरून या माध्यमातून त्यांचा विकास होईल. ती आजही सुरू आहे. अभ्यास अध्यापन करण्यासाठी ग्रंथालयाची आवश्यकता आहे पण त्याकरिता प्रत्येकांनी शिक्षण घेत असतांना ग्रंथ खरेदीवर जास्तीत जास्त भर द्यायला पाहिजे. यामधूनच कदाचित अनेक ठिकाणी सार्वजनिक वाचनालय सुरू झाले आहेत पण त्यांचा वाचक वर्ग फारसा प्रतिसाद देत नाही. पाचनवृत्ती ही कमी होत चालली आहे. "वाचाल तर वाचाल" या म्हणीची आवश्यकता आज दिसून येत आहे.

**संदर्भसूची :**


१. फडके भालचंद्र, फुले आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.

२. बहिष्कृत भारत, मे १९२७

३. जनता वृत्तपत्र, १३ ऑगस्ट १९४६

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक विचार- नंदीनी गोवळी,, कोल्हापूर

५. डॉ. बाबासाहेब आंबेबडकर शैक्षणिक विचार- शामराव रणदिवे म्हसवड

६. कित्ता, पृष्ठ क्र.९१-९२.

७. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडक - पॉप्युलर प्रकाशन, मुंबइ.

८. मोरे दिनेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पुणे, डॉ. बाबासाहेब

९. प्रा.डॉ. खंडेरावजी एस. काळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विविध दृष्टिकोण


*****